

# मराठी
# सुगमभारती

## इयत्ता पाचवी



# अक्षरबाग

- फुलझाडावरील अक्षरे व कुंडीवरील शब्द वाचा. फुलझाडावरील प्रत्येक अक्षरापासून सुरू होणारे शब्द सांगा.
- तुम्हांला कोणकोणत्या अक्षरांनी सुरू होणारे शब्द सांगता आले नाहीत ते सांगा.



शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/ह/भाषा/मंजुरी/ड-५०५/७२७ दिनांक : २३/२/२०१५

# मराठी

# सुगमभारती

## इयत्ता पाचवी

(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)



विद्यार्थ्याचे नाव : ____________________

शाळेचे नाव : ____________________

इयत्ता : __________ तुकडी : __________

पत्ता : ____________________

____________________

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

AY9SNT

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१५
पाचवे पुनर्मुद्रण : २०२०

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती**

इरगोंडा पाटील
फादर फ्रान्सिस दिब्रिटो
वाहरू सोनवणे
प्रा. प्रज्ञा दया पवार
डॉ. सुभाष सावरकर
किशोर दरक
श्रीमती सविता अनिल वायळ

**मराठी भाषा समिती – कार्यगट**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**संयोजन** : सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार** : राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ** : राजेंद्र गिरधारी

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर,
निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश** :N/PB/2020-21/Qty. 1.00

**मुद्रक** :M/s

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

## *प्रस्तावना*

महाराष्ट्र शासनाने राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय सन २००९ मध्ये घेतला. 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२' मध्येही याच धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी (संयुक्त) अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पाचवीचे 'मराठी सुगमभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

मराठी हा विषय अनिवार्य केल्यामुळे इयत्ता पहिलीपासून मराठी विषयाची ओळख विद्यार्थ्यांना झाली आहे. इयत्ता चौथीपर्यंत श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केली आहेत. हीच भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील गाणी, कविता, चित्रकथा, गोष्टी, अनुभव, शब्दकोडी, सूचना, विनोद, भाषिक खेळ दिले आहेत. विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन, मूकवाचन, अनुलेखन व श्रुतलेखन करून घेण्यासाठी पाठांखाली सूचना दिल्या आहेत; जेणेकरून या विद्यार्थ्यांना सहजतेने भाषण-संभाषण, वाचन, लेखन करता येईल. एकाच अक्षरापासून अनेक शब्द बनवणे, त्यांची कार्डे तयार करणे, स्वतःहून शब्द बनवणे इत्यादी गोष्टी दिल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत भर पडेल.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक तयार करताना मराठी भाषा समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. इरगोंडा पाटील यांनी मराठी भाषा समितीच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून मोलाचे मार्गदर्शन केले. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक, भाषातज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. श्रीमती उमा विसुभाऊ बापट व श्री. शिवाजी तांबे या निमंत्रित तज्ज्ञांचेही सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ५ मार्च २०१५
भारतीय सौर १४ फाल्गुन, १९३६

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# इयत्ता पाचवी – मराठी सुगमभारती अध्ययन निष्पत्ती

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**<br>• विविध विषय, परिस्थिती, घटना, अनुभव, कथा, कविता इत्यादी स्वत:च्या पद्धतीने आणि मराठी भाषेत (तोंडी/सांकेतिक स्वरूपात) सांगणे, प्रश्न विचारणे, टिपण करणे, आपले मत देणे यांसाठीचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• ग्रंथालय/वर्गात वेगवेगळ्या प्रकारच्या कथा, कविता, अथवा बालसाहित्य, स्तरांनुसार इतर साहित्य, जाहिरात फलक, वर्तमानपत्र यांतील कात्रणे उपलब्ध असावीत आणि यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• वेगवेगळ्या कथा, कविता, फलक इत्यादींना संदर्भानुसार वाचून समजणे–समजावणे, यांसाठी संधी दिल्या जाव्यात.<br>• ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने मराठी भाषेत लिहिण्याच्या संधी दिल्या जाव्यात.<br>• आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार मराठी भाषा समजून घेण्याची (नवीन शब्द/वाक्य इत्यादी) आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• एकमेकांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकणे, पुस्तकातील गोष्टी वाचणे आणि त्यावर आपले मत देणे.<br>• आजूबाजूला घडणाऱ्या क्रिया/घटना विचारात घेऊन प्रश्न विचारणे, मुलांशी चर्चा करणे, टिपण तयार करणे, मत देणे यासारख्या संधी उपलब्ध करून द्याव्या.<br>• आशयाच्या संदर्भाने वापरल्या जाणाऱ्या भाषेचे बारकावे समजून घेण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• नवीन शब्द चित्र–शब्दकोश/शब्दकोश यातून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>• इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला इत्यादी) येणारे शब्द समजणे आणि त्यांचा संदर्भानुसार वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• पाठ्यपुस्तक आणि त्याच्याशी संबंधित इतर साहित्यांत आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आणि इतर संवेदनशील मुद्द्यांना समजून घेऊन त्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी. | **अध्ययनार्थी –**<br>05.LA.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी, साहसी, सामाजिक विषयांवरील कथा, कविता इत्यादी) विषय, घटना, चित्रं, पात्रं व शीर्षक यांबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत देतात, तर्क करतात व निष्कर्ष काढतात.<br>05.LA.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग, घटना इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.<br>05.LA.03 भाषेच्या सूक्ष्म निरीक्षणातून स्वत:ची मौखिक भाषा तयार करतात.<br>05.LA.04 विविध प्रकारच्या साहित्यातील (उदा. वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर इत्यादींमधील) संवेदनशील मुद्द्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात. उदा. 'हत्ती आणि लांडगा' हा पाठ वाचून मुले म्हणतात, 'आम्ही नेहमीच इतरांना मदत करतो.'<br>05.LA.05 भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी (फलकावरील सूचना, कार्यअहवाल, माहिती मिळवण्यासाठी) वाचतात.<br>05.LA.06 आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे, बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात, त्यांविषयी बोलतात.<br>05.LA.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.<br>05.LA.08 भाषेतील बारकावे, नियम इत्यादींचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात/ब्रेल लिपीत समावेश करतात.<br>05.LA.09 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा. पूर्णविराम) जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.<br>05.LA.10 स्तरांनुसार इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला इत्यादींमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.<br>05.LA.11 आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांबाबत तोंडी स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.<br>05.LA.12 पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारांतील संवेदनशील विषयावर तोंडी स्वरूपात अभिव्यक्त होतात.<br>05.LA.13 आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र इत्यादी कथन करतात. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | आनंदाने नाचूया! (गाणे) | के. नारखेडे | १ |
| २. | समजूतदार मांजरे (चित्रकथा) | – | २ |
| ३. | ‘ळी’ ची साखळी | – | ३ |
| ४. | सुंदरतेची भेट (कविता) | विजया वाड | ४ |
| ५. | मी गाय बोलते... | – | ५ |
| ६. | ऐकूया. खेळूया. | – | ८ |
| ७. | झाडाचं मूल (कविता) | शं. ल. नाईक | ९ |
| ८. | अनुभव–१ | – | ११ |
| ९. | वाऱ्याला चूक कळली | – | १४ |
| १०. | घाटातली वाट (कविता) | सरिता पदकी | १६ |
| ११. | हत्ती आणि लांडगा | – | १८ |
| १२. | चांगली वागणूक | – | १९ |
| १३. | अनुभव–२ | – | २२ |
| १४. | माझा भारत! (कविता) | संजीवनी मराठे | २४ |
| १५. | वाढदिवस | – | २६ |
| १६. | घामाचा तलाव | अवधूत म्हमाणे | २८ |
| १७. | वाचूया. लिहूया. | – | ३० |
| १८. | अम्मीची माया | – | ३२ |
| १९. | पलीकडे ओढ्यावर (कविता) | गणेश कुडे | ३४ |
| २०. | महात्मा जोतीराव फुले | हरी नरके | ३६ |

# १. आनंदाने नाचूया!

• ऐका. वाचा.

चला गड्यांनो खेळूया,
आनंदाने नाचूया! ।।
बाग चिमुकली,
फुले उमलली,
सुंदर फुलली,
फुलांसारखे होऊया,
फुलांभोवती नाचूया! ।।

फुलांभोवती,
भुंगे फिरती,
गाणी गाती,
तसेच आपण गाऊया,
ताल धरोनी नाचूया! ।।

आभाळाचे,
तऱ्हेतऱ्हेचे,
रंग मजेचे,
चला चला रे पाहूया,
आनंदाने नाचूया! ।।

**– के. नारखेडे**



**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांकडून गटात तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावे.

# २. समजूतदार मांजरे

- पाहा. ऐका. वाचा.



मांजरे



तराजू



माकड



लोणी

- पाहा. सांगा.



















## स्वाध्याय

प्र. १. चित्रांतील प्राण्यांची व वस्तूंची नावे सांगा.

प्र. २. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.

प्र. ३. वरील चित्रे पाहून गोष्ट सांगा.


प्र. ४. कोण ते सांगा.

(अ) आधी आपापसात भांडणारी, नंतर समजूतदारपणे वागणारी.


(आ) मांजरांना फसवणारे.


(इ) माकडाची लबाडी ओळखणारी.

# ३. ‘ळी’ ची साखळी











- **खाली काही शब्दसमूह व चित्रे दिलेली आहेत. त्यावरून शब्दसमूहाला सुसंगत अक्षर लिहून शब्द पूर्ण करा व लिहा.**

१. भाजी चिरण्यासाठी वापरतात. ···· ळी

२. लाकडांची बांधलेली. ···· ळी

३. ज्याच्यापासून शिकरण करतात ती फळे. ···· ळी

४. झाडांची पाने कुरतडणारी. ···· ळी

५. कोळशाच्या रंगाची. ···· ळी

६. फुलाची उमलण्यापूर्वीची स्थिती. ···· ळी

७. फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला येणारा एक सण. ···· ळी

८. सणाला केला जाणारा पुरणाचा एक पदार्थ. ···· ळी

९. दोन्ही हातांनी मिळून वाजवतात. ···· ळी









**उपक्रम :** १. रा, री अक्षराने शेवट होणारे प्रत्येकी पाच शब्द लिहा.
२. तुम्हांला आवडणाऱ्या अक्षराने सुरुवात होणारे पाच शब्द लिहा.

**शिक्षकांसाठी :** एखाद्या शब्दाचे सुरुवातीचे किंवा शेवटचे अक्षर लक्षात घेऊन वरीलप्रमाणेच चित्र व शब्द यांची साखळी करून मुलांचा शब्दसंग्रह वाढवावा.

# ४. सुंदरतेची भेट

• **ऐका. वाचा.**

झुळझुळ वाहे झरा
तयाचे पाणी हो निर्मळ
संथ वाहते नदी घेऊनि
निळसर निर्मळ जल ।।१।।
खट्याळ वारा वाहवाहता
घेऊनि ताजी हवा
कळ्याफुलांचा सुगंध संगे
रोज वाहतो नवा ।।२।।
सूर्य देतसे पिवळे सुंदर
सुवर्णरंगी ऊन
निसर्ग गातो निर्मळ गाणे
लख्ख लख्खशी धून ।।३।।
कुणी शिकवली अशी स्वच्छता
या साऱ्या दूतांना ?
निसर्ग झाला गुरू तयांचा
दिला पाठ सर्वांना ।।४।।
जिथे स्वच्छता तिथे देवता
हेच आमुचे ब्रीद
जीवन निर्मळ, परिसर निर्मळ
हीच आमुची जिद्द ।।५।।



**– विजया वाड**

**शब्दार्थ :** **निर्मळ** – स्वच्छ, पवित्र. **खट्याळ** – खोडकर. **सुवर्णरंगी** – सोन्याच्या रंगाप्रमाणे, चकाकणारे. **दूत** – निरोप किंवा बातमी सांगणारा. **पाठ** – धडा, शिकवण.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) झरा कसा वाहत आहे ?
(आ) निसर्ग कोणाचा गुरू झालेला आहे ?
(इ) मुलांच्या मनात कोणती जिद्द आहे ?


**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पाणी | (अ) खट्याळ |
| (२) वारा | (आ) सुवर्णरंगी |
| (३) ऊन | (इ) निर्मळ |

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून गटात, तसेच वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.

# ५. मी गाय बोलते...

• ऐका. वाचा.























**दुधापासून बनवलेले हे सगळे पदार्थ सकस असतात. शक्ती देणारे असतात, कारण दूध हे आरोग्यदायक आहे.**

**आता सांगा बरं, दुधापासून आणखी काय काय बनवतात?**

**शिक्षकांसाठी :** एखाद्या विद्यार्थ्याला गाईचा मुखवटा लावून या पाठाचे सादरीकरण वर्गात करून घ्यावे. गाईप्रमाणे कुत्रा, मांजर, बकरी बोलू लागली तर काय बोलतील, याची कल्पना करण्यास सांगून त्याचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण करून घ्यावे.

## स्वाध्याय

**प्र. १. शब्द क्रमाने वाचा.**

दूध → दही → ताक → लोणी → तूप.

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(अ) दुधापासून काय काय बनवता येते?

(आ) तुमच्या घरी दूध कोठून आणतात?

(इ) दुधाचा सध्याचा भाव काय आहे?

**प्र. ३. दूध लीटरमध्ये मोजतात. कापड मीटरमध्ये, तर धान्य, भाजी ग्रॅम/किलोग्रॅममध्ये मोजतात. अंतर किलोमीटरमध्ये मोजतात. खाली काही वस्तू, पदार्थ दिले आहेत. ते कसे मोजतात त्यानुसार गट करून तक्ता पूर्ण करा.**

भेंडी, गवार, टॉवेल, जवस, बाजरी, मिरची, कापड, साडी, पेरू, कारली, गोडेतेल, तूप, लाडू, पेट्रोल, रॉकेल, डिझेल, पाणी, साखर, गहू, दोन ठिकांणामधील अंतर.

| लीटर | ग्रॅम/किलोग्रॅम | मीटर | किलोमीटर |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**प्र. ४. हे शब्द असेच लिहा.**

मित्र, सर्वांना, शक्ती, लस्सी, रसगुल्ला, आरोग्यदायक, तुम्ही, तुम्हांला,

**प्र. ५. वाचा व समजून घ्या.**

दूध, दुधाची, दुधापासून, दही, दह्याचे, दह्यापासून.

**प्र. ६. खालील शब्द वाचा व त्यांपासून वाक्ये बनवा.**

गाय, रंग, शिंगे, शेपूट, पाय, कान, डोळे, दूध, शेण.

**उदा.**, गाईचा रंग तांबडा आहे.

**प्र. ७. एका वाक्यात उत्तरे द्या.**

(अ) सोने कसे मोजतात?

(आ) पाणी किलोमध्ये मोजता येईल का?


(इ) ताप आला तर कशाने मोजतात?

**प्रात्यक्षिक :** एक लीटर मापाच्या रिकाम्या प्लॅस्टिकच्या बाटलीचे वजन करा. बाटलीत पाणी भरून पाण्यासह बाटलीचे वजन करा. एक लीटर पाण्याचे वजन किती भरते ते सांगा. त्याच बाटलीत दूध भरा. दुधासह बाटलीचे वजन करा. एक लीटर दुधाचे वजन किती भरते ते सांगा. एक लीटर पाणी व एक लीटर दूध यांच्या वजनांची तुलना करा.


# ६. ऐकूया. खेळूया.

BBYGDL

• ऐका. चित्रे पाहा. कृती करा.



पन्नास मीटर सरळरेषेत धावा.



तीन मीटर हत्तीसारखे चाला.



बेडकाप्रमाणे दहा उड्या मारा.



चार कोलांट्या उड्या मारा.



शंकूवरून उड्या मारा.



एका जागी पाच उंच उड्या मारा.



दोरीवरच्या वीस उड्या मारा.



जमिनीवरील शिडीच्या चौकोनांतून धावा.

• तुम्ही कोणकोणत्या कृती केल्या ते सांगा.

# ७. झाडाचं मूल

• ऐका. वाचा.



डोळे उघडून
म्हणालं फूल,
झाडाचं मी
आहे मूल!

अंगावर माझ्या
कपडे रंगीत,
वाऱ्याचं मी
ऐकतो संगीत!

फुलपाखरं मला
भेटायला येतात,
भोवती भुंगे
गाणी गातात!

उन्हात मी
मांडतो खेळ,
मजेत जातो
सारा वेळ!

झाडाच्या मी
खांद्यावर बसतो,
आनंदानं मी
गालात हसतो!

– शं. ल. नाईक

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा. लिहा.**

(अ) या कवितेत तुमच्याशी कोण बोलत आहे?
(आ) फुलाजवळ कोण कोण येतात?
(इ) फुलाचा सारा वेळ कसा जातो?
(ई) या कवितेतील फूल काय काय करते?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) झाडाचं मूल | (अ) फुलपाखरे |
| (२) फुलाच्या पाकळ्यांचे विविध रंग | (आ) भुंगे |
| (३) गाणे गात फुलाभोवती फिरणारे | (इ) फूल |
| (४) फुलाला भेटायला येणारी | (ई) अंगावरील रंगीत कपडे |

**प्र. ३. शेवटी सारखे अक्षर असणाऱ्या कवितेतील शब्दांच्या जोड्या लिहा.**

**उदा.,** फूल-मूल.

**प्र. ४. तुमच्या मनाने उत्तरे सांगा.**

(अ) तुम्हांला घरी कोण कोण भेटायला येतात?

(आ) कोणकोणत्या गोष्टींमुळे तुमचा वेळ मजेत जातो?

**प्र. ५. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

म्हणालं, माझ्या, वाऱ्याचं, उन्हात, झाडाच्या, खांद्यावर.

**वाचू आणि हसू.**

१




२ तोच माणूस दोन दिवसांनी वेशांतर करून पुन्हा त्या दुकानात गेला.




३ तोच माणूस आठ दिवसांनी वेगळे वेशांतर करून पुन्हा त्या दुकानात गेला.




BC8CF9

# ८. अनुभव – १

## रक्षाबंधन

रविवार सुट्टीचा दिवस. मुले मैदानावर खेळत होती. खेळून खेळून दमली आणि मैदानाच्या बाजूला असलेल्या एका कट्ट्यावर बसली. त्यांच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या.

**तेजस** : अरे रमेश, आज हातावर राखी कशी?

**रमेश** : अरे, ताईनं माझ्यासाठी पोस्टानं राखी पाठवली. ती मला आजच मिळाली. मग मी लगेच हातावर राखी बांधली.



**ॲना** : आम्ही पोस्टानंच राख्या पाठवल्या. त्यांना त्या मिळाल्या असतील.

**कविता** : कुणाला पाठवल्या गं?

**ॲना** : अगं, आमच्या शाळेत आम्ही एक उपक्रम केला. बाईंनी आम्हांला शाळेत राख्या आणायला सांगितल्या होत्या. जमलेल्या सगळ्या राख्या आम्ही सीमेवरच्या सैनिकांना पाठवल्या. त्यासोबत शुभेच्छापत्रही पाठवलं.

**तेजस** : सीमेवरच्या सैनिकांनाच का?



**ॲना** : सैनिक आपल्या कुटुंबांपासून दूर सीमेवर असतात. देशाचं रक्षण करतात, म्हणून आम्ही त्यांच्यासाठी राख्या पाठवल्या.

**कविता** : खूपच छान. अगं आमच्या ओळखीचे एक काका अनाथाश्रम चालवतात. तिथं बरीच मुलं आहेत. त्यांना कोणीही नातेवाईक नाहीत. आम्ही दरवर्षी राख्या तयार करून तिथे जाऊन त्यांना राख्या बांधतो. त्यांना खूप आनंद मिळतो.

**तेजस** : तुम्ही राखी बनवण्यासाठी कोणकोणतं साहित्य वापरलं?


**कविता** : अरे, त्यासाठी आम्ही रंगीत मखमली कागद, गोंडे, मणी, रंगीत स्पंज अशा वस्तू वापरल्या.



**रमेश** : आम्हीपण शाळेत रक्षाबंधन केलं. वर्गातल्या मुलींनी आम्हांला राख्या बांधल्या. आम्हीपण त्यांना ओवाळणी घातली. मला रेखानं राखी बांधली. मी भेट म्हणून दिलेलं पेन तिला खूप आवडलं.

**सतीश** : ताईच्या शाळेत राखी तयार करायला शिकवलं होतं. ताईनं घरी राखी तयार केली. मीपण तिला मदत केली. ताईनं स्वतः तयार केलेली राखी मला बांधली.

**तेजस** : मला तर माझ्या ताईनं पाटावर बसवलं. त्याभोवती रांगोळी काढली. मला ओवाळलं. हातावर राखी बांधली. मला लाडू भरवला. मग मी ताईला वाकून नमस्कार केला.



(इतक्यात तेजसला त्याच्या आईने हाक मारली. आणि सर्वजण आपापल्या घरी गेले.)

---

**शब्दार्थ : अनाथाश्रम** – ज्यांना आई-वडील नाहीत, कुणी नातेवाईक नाहीत, अशा मुलामुलींची राहण्याची जागा. **भरवणे** – स्वतःच्या हाताने खाऊ घालणे.

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा. लिहा.**

(अ) मैदानावर किती मुलेमुली खेळत होती?

(आ) मुले कोणत्या सणाविषयी बोलत होती?

(इ) ॲनाच्या शाळेने कोणता उपक्रम केला?

(ई) रक्षाबंधनाविषयी कविताने कोणता अनुभव सांगितला?

(उ) रक्षाबंधन हा सण कोणत्या महिन्यात येतो?

**प्र. २. तुमच्या परिसरात कोणकोणते सण साजरे करतात?**

**प्र. ३. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

मैदान, आम्ही, सगळ्यांनी, मिळाल्या, अनाथाश्रम, उपक्रम, दरवर्षी, रक्षाबंधन.

**प्र. ४. वाचा. ही वाक्ये अशीच लिहा.**

(अ) आम्ही पोस्टानंच राख्या पाठवल्या.

(आ) सैनिक देशाचं रक्षण करतात.

(इ) त्यांना कोणीही नातेवाईक नाहीत.

(ई) त्याभोवती रांगोळी काढली.

(उ) सर्वजण आपापल्या घरी गेले.

**प्र. ५. तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे होतात? तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका सणाची माहिती लिहा.**

**प्र. ६. वाचा. समजून घ्या.**

| एक | अनेक |
|---|---|
| राखी | राख्या |
| वही | वह्या |
| रांगोळी | रांगोळ्या |
| सुट्टी | सुट्ट्या |


| एक | अनेक |
|---|---|
| सैनिक | सैनिक |
| भाऊ | भाऊ |
| काका | काका |
| शाळा | शाळा |

**उपक्रम :** तुम्हांला आलेल्या राख्यांचे वर्गात प्रदर्शन भरवा. राख्या बनवण्यासाठी कोणकोणत्या वस्तू वापरल्या याविषयी चर्चा करा. टाकाऊ वस्तूंपासून राख्या बनवा.

- **वाचा.**

श्रावण महिन्यातील पौर्णिमेला रक्षाबंधनाचा सण साजरा करतात. या पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी मच्छीमार लोक सागराची पूजा करतात व सागराला नारळ अर्पण करतात.

बहीण भावाला स्नेहाचा धागा बांधते, त्यालाच राखी म्हणतात. या दिवशी घरामध्ये गोड पदार्थ करतात. भाऊबहिणींनी एकमेकांना अडचणीच्या वेळी मदत करावी, अशी भावना त्यामागे असते. बहीण-भावातील नाते अधिक घट्ट करणारा, प्रेम व्यक्त करणारा हा सण आहे. देशातील बहुतेक सर्व भागांत रक्षाबंधन हा सण साजरा केला जातो.






BCH8GH


**शिक्षकांसाठी :** प्रत्येकी पाच मुलांचा गट करून या पाठातील संवादांचे प्रकट वाचन करून घ्यावे. कोणत्या गटाचे वाचन सर्वांत चांगले वाटले व का, याबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. स्वाध्यायानंतर 'वाचा' म्हणून उतारा दिला आहे. त्याचे विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन व अनुलेखन करून घ्यावे.

# ९. वाऱ्याला चूक कळली


• **पाहा. वाचा.**




वारा सगळ्यांना त्रास द्यायचा. नको नको करून सोडायचा. वाऱ्याला आपल्या शक्तीचा खूप गर्व होता.




एके दिवशी वारा खूप जोरात सुटला. वाऱ्याने अनेक झाडांना मुळासकट खाली पाडले. झाडांच्या पानांना झाडांपासून अलग केले. त्यांना दूरवर उडवत नेले. मातीला उडवले. झाडावरील पक्ष्यांची घरटी मोडली.



ते चिमणीने पाहिले आणि ती त्याला म्हणाली, ''अरे वाऱ्या, तू असे का करतोस? सगळ्यांना त्रास होईल, असे का वागतोस? तू खूप शक्तिमान आहेस ना, तर पर्वताला खाली पाडून दाखव.''



तो पर्वताच्या चारही बाजूंनी जोरजोरात वाहू लागला. गर्विष्ठ वाऱ्याने पर्वताला खाली पाडण्याचा प्रयत्न केला; पण पर्वतावरील एकही दगड तो हालवू शकला नाही.



शेवटी वारा थकला व थांबला. पर्वताला म्हणाला, ''मित्रा, तू खूप बलवान आहेस. मला माझी चूक समजली आहे. यापुढे मी कोणालाही असा त्रास देणार नाही.''

**शिक्षकांसाठी :** या पाठाचे विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन करून घ्यावे व कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.

**शब्दार्थ : नको नको करून सोडणे** – खूप त्रास देणे. **गर्व** – ताठा, अहंकार. **शक्तिमान** – खूप शक्ती असलेला, बलवान. **गर्विष्ठ** – गर्व असलेला.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) आपल्या शक्तीचा कोणाला गर्व होता?
(आ) वाऱ्याने कोणाकोणाला त्रास दिला?
(इ) चिमणीने वाऱ्याला काय सांगितले?
(ई) वारा का थकला?
(उ) वाऱ्यापेक्षा बलवान कोण ठरले?

**प्र. २. विचार करा व तुमच्या मनाने उत्तर सांगा.**

पर्वतापेक्षा बलवान कोण असेल?

**प्र. ३. खालील शब्द जोडून नवीन शब्द तयार करा.**

**उदा.**, बल – बलवान.

ताकद →
धन →
गुण →
रूप →
वान

### वाचू आणि हसू.

एका प्राणिसंग्रहालयातील दोन कांगारू रात्री पळून जायचे. त्यांना शोधून आणावे लागे. शेवटी त्यावर उपाय म्हणून पिंजऱ्याची उंची वीस फूट करण्यात आली; पण पुन्हा तोच प्रकार घडला. पुन्हा उंची वाढवून तीस फूट करण्यात आली. त्याचाही काही उपयोग झाला नाही. पुन्हा कांगारू पळालेच!

शेजारच्या उंटाने त्यांना विचारले, ''कसं शक्य होतं रे हे?''

''पिंजऱ्याची उंची कितीही वाढवली, तरी काहीच उपयोग नाही. रात्री हे लोक पिंजऱ्याच्या दाराला कुलूप लावायलाच विसरून जातात.''





**उपक्रम :** तुमच्या मातृभाषेतील विनोदांचा संग्रह करा. वर्गात सांगा. तेच विनोद मराठी भाषेतून सांगा.

# १०. घाटातली वाट

• ऐका. वाचा.



घाटातली वाट,
काय तिचा थाट !
मुरकते, गिरकते,
लवते पाठोपाठ.

निळी-निळी परडी,
कोणी केली पालथी ?
पानं-फुलं सांडली,
वर आणि खालती.

खाली खोल दरी,
वर उंच कडा,
भला मोठा नाग, जणू
उभा काढून फडा.

भिऊ नका कोणी,
पाखरांची गाणी,
सोबतीला गात गात,
खळाळतं पाणी.

घाटातली वाट,
काय तिचा थाट!
गाणी म्हणू, टाळ्या पिटू,
जाऊ रुबाबात.

**– सरिता पदकी**

---

शब्दार्थ : **घाटातली वाट** – डोंगर ओलांडून जाण्याचा रस्ता, डोंगरावरची वळणावळणाची वाट. **मुरकणे** – मुरडणे. **गिरकणे** – गिरकी घेणे, स्वत:भोवती फिरणे. **लवणे** – वाकणे. **परडी** – फुले ठेवण्याची टोपली. **पालथी** – उपडी, उलटी. **फडा** – फणा. **पाखरू** – पक्षी.

---

## स्वाध्याय

**प्र. १. शेवटी समान अक्षर असणारे कवितेतील शब्द लिहा.**

(अ) वाट (आ) गिरकते (इ) गाणी

प्र. २. जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (१) | खळाळत जाणारे | (अ) | घाटातील वाट |
| (२) | खोल | (आ) | पाणी |
| (३) | उंच | (इ) | दरी |
| (४) | मुरकणारी, गिरकणारी | (ई) | कडा |

प्र. ३. कवितेतील खालील अर्थाच्या ओळी शोधा व लिहा.

(अ) घाटात इकडे तिकडे उगवलेली फुले पाहून कोणाची तरी फुलांची टोपली पालथी पडली व त्यातील फुले खाली सांडली, असे वाटते.


(आ) खोल दरीच्या बाजूला उंच कडा पाहून नाग फणा काढून उभा राहिला आहे, असे वाटते.

प्र. ४. 'खळखळ' या नादमय शब्दापासून बनलेला 'खळाळतं' हा शब्द कवितेत आला आहे. असे आणखी नादमय शब्द सांगा.

प्र. ५. 'पाठोपाठ' हा शब्द कवितेत आलेला आहे. या शब्दासारखे खालील शब्द वाचा. लिहा. त्यांसारखे आणखी शब्द माहीत करून घ्या.


काठोकाठ, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, गल्लोगल्ली, गावोगाव.

प्र. ६. चित्रांत रस्त्यांचे काही प्रकार दिलेले आहेत, ते पाहा. त्यांची नावे वाचा. याशिवाय तुम्ही पाहिलेल्या रस्त्यांचे वर्णन करा.



घाटातील वाट


शेतातील पायवाट


डांबरी रस्ता


सिमेंटचा रस्ता


पदपथ




उड्डाणपूल


**शिक्षकांसाठी** : कविता विद्यार्थ्यांकडून गटांत वाचून घ्यावी. कविता तालासुरात गाऊन घ्यावी. या पृष्ठावर दिलेल्या चित्रांतील रस्त्यांचे वर्णन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.

# ११. हत्ती आणि लांडगा

BD9VLU

* ऐका. म्हणा.

एके दिवशी एका  एक  पकडला. त्याने त्याचे पाय वेलीने बांधून  ठेवले.  खूप घाबरला.  निपचित पडून राहिला.  टोपली डोक्यावर घेतली आणि तो जंगलात निघाला. 'वाचवा, वाचवा' असे  ओरडू लागला. एक  फणसाच्या झाडाचा पाला खात होता. त्याने  आवाज ऐकला. हत्तीने  पाहिले.  त्याची दया आली. त्याने  मदत करायचे ठरवले.  एक युक्ती सुचली. त्याने पटकन एक  तोडला.

 झाडाजवळून जात असताना त्या जागी  ठेवला. हत्तीने  हळूच उचलले.  काहीही कळले नाही. तो पुढे निघून गेला.   जीव वाचवला. दोघांची छान मैत्री झाली.

लांडग्याने, ससा, सशाला टोपलीत, ससा, ससा, लांडग्याने, ससा, हत्ती, सशाचा, टोपलीतील सशाला, हत्तीला, सशाला, हत्तीला, फणस, लांडगा, हत्तीने फणस, टोपलीतील सशाला, लांडग्याला, हत्तीने, सशाचा.

**शिक्षकांसाठी :** वर दिलेल्या कथेमध्ये चित्रांच्या जागी चौकटीतील शब्द घेऊन कथा स्वतः वाचावी. विद्यार्थ्यांकडून पुन्हा ती कथा वाचून घ्यावी. कथा लिहायला सांगावी.

# १२. चांगली वागणूक

- ऐका. वाचा.

१




गावात नवीन आलेल्या चंदूने किराणामालाचे छोटेसे दुकान सुरू केले.

२




दुकानात आलेल्या प्रत्येक व्यक्तीशी तो खूप आपुलकीने वागत असे. त्याच्या बोलण्यात गोडवा होता.

३



एकदा दुकान बंद करून घरी जाताना त्याच्या दुकानात एक छोटी मुलगी आली.

४




५




मिठासारख्या छोट्या गोष्टीसाठी चंदूने दुकान पुन्हा उघडले. तिला मीठ दिले.

६




तिने पळत जाऊन ही गोष्ट घरी सांगितली. ही छोटीशी गोष्ट कानोकानी गावभर पसरली.




चंदूच्या दुकानातली गर्दी हळूहळू वाढू लागली. चंदूचा चंदूशेठ झाला. त्याच्या दुकानाचा पसाराही खूप वाढला; पण चंदूशेठ आजही तो प्रसंग विसरला नाही.

---

**शब्दार्थ : रडवेली होणे** – रडावेसे वाटणे. **कानोकानी होणे** – एकाने दुसऱ्यास सांगणे.

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा व लिहा.**

(अ) किराणामालाचे दुकान कोणी सुरू केले?
(आ) मुलगी रडवेली का झाली होती?
(इ) चंदूची कोणती गोष्ट तुम्हांला आवडली? का?
(ई) चंदूच्या दुकानात गर्दी का वाढू लागली?

**प्र. २. तुमच्या परिसरातील एखादा दुकानदार तुम्हांला आवडतो का? तो दुकानदार तुम्हांला का आवडतो ते सांगा.**

**प्र. ३. कानोकानी, हळूहळू हे जोडशब्द वापरून वाक्ये लिहा.**

**प्र. ४. वाचा. खाली दिलेले शब्द असेच लिहा.**


आलेल्या, प्रत्येक, व्यक्तीशी, उद्या, छोट्या, गोष्टीसाठी, पुन्हा, गर्दी.

**प्र. ५. वाचा. खाली दिलेली वाक्ये लिहा.**

(अ) दुकानात आलेल्या गिऱ्हाइकांशी प्रेमाने वागावे.
(आ) गिऱ्हाइकांची अडवणूक करू नये. त्यांची फसवणूक करू नये.
(इ) छोटी वाटणारी एखादी चांगली गोष्टदेखील माणसाचे आयुष्य सुधारते.

**उपक्रम :** तुमच्या परिसरातील किराणामालाच्या दुकानास भेट द्या. दुकानातील पंधरा-वीस वस्तूंची नावे लिहा. त्यांचे भाव विचारून घ्या. वस्तूंच्या नावांसमोर भाव लिहा. वर्गात वाचून दाखवा.

**प्रात्यक्षिक :** (१) किरणामालातील विविध डाळी व धान्ये यांचा उपयोग भेटकार्ड बनवण्यासाठी करा.
(२) रिकाम्या काडीपेट्यांची आगगाडी बनवा. चित्रात दाखवल्याप्रमाणे त्यावर किराणामालातील वस्तूंची नावे लिहा.
(३) काडीपेटी कशी बनते, याची माहिती मिळवा.




- खालील चौकटींत किरणामालाच्या दुकानातील वस्तूंची नावे दिली आहेत. ती शोधा व लिहा.
  उदा., मैदा, चिंच, चहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मै | खो | गो | डे | ते | ल | मू | म |
| दा | ब | पो | हे | सा | चिं | ग | ट |
| जि | रे | हिं | शें | ख | च | हा | की |
| ब | गू | भ | ग | र | ना | च | णी |
| तां | दू | ळ | दा | हू | वा | ति | ह |
| सा | बु | दा | णे | बा | ल | ख | र |
| ब | गो | ह | मो | ज | च | ट | भ |
| ण | ळ्या | ळ | ह | री | व | मी | रा |
| ध | ने | द | री | डा | ळी | ठ | क |

# १३. अनुभव – २

## प्रामाणिक रिक्षावाला



आमच्या दारासमोर रिक्षा थांबली. मी बाहेर येऊन पाहिले. माझी मावशी आली होती. मी तिची एक पिशवी घेतली. मावशीने रिक्षावाले काकांना पैसे दिले आणि दुसरी पिशवी घेऊन ती घरात आली. रिक्षावाले काका निघून गेले.

आईने मावशीला पाणी दिले. ती पाणी प्यायली. मावशीने पिशवीतील सामान बाहेर काढले; पण आत पैशांची पर्स नव्हती. मावशी मला म्हणाली, ''अगं उषा, माझी पर्स कुठेतरी पडली वाटतं. रिक्षात तर पडली नसेल? रिक्षा तर निघून गेली. आता काय करायचं?'' पर्स कुठे पडली असेल, असा विचार आम्ही सगळे करत होतो.

थोड्याच वेळात एक रिक्षा दारासमोर येऊन उभी राहिली. मी डोकावून पाहिले. थोड्या वेळापूर्वी मावशीला सोडून गेलेले रिक्षावाले काका होते. मी त्यांना ओळखले. ते म्हणाले, ''तुझ्या मावशीची पर्स माझ्या रिक्षात पडली होती. ती परत करायला आलोय.'' मी त्यांना घरात नेले. रिक्षावाले काकांनी मावशीची पर्स परत केली. आईने त्यांना चहा दिला. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आभार मानले.



**शब्दार्थ :** **पर्स** – वस्तू, पैसे ठेवण्याची पिशवी. **डोकावणे** – सहज वाकून पाहणे. **प्रामाणिक** – इमानदार.

### स्वाध्याय

**प्र. १. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(मावशी, मावशीने, मावशीला, मावशीची, मावशीला)

(अ) माझी ................ रिक्षातून आली.

(आ) आईने .......... पाणी दिले.

(इ) ........... पिशवीतील सामान बाहेर काढले.

(ई) ........... पर्स सामानात दिसली नाही.

(उ) रिक्षावाल्या काकांनी ................ पर्स परत केली.

**शिक्षकांसाठी :** या पाठाचे विद्यार्थ्यांकडून मूकवाचन करून घ्यावे व एका परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा व लिहा.**

(अ) या पाठातील अनुभव कोण सांगत आहे? हे कोणत्या वाक्यावरून कळले?

(आ) रिक्षावाल्याचा कोणता गुण या पाठातून दिसतो?

**प्र. ३. कोण कोणास म्हणाले ते सांगा.**

(अ) ''अगं उषा, माझी पर्स कुठेतरी पडली वाटतं.''

(आ) ''तुझ्या मावशीची पर्स माझ्या रिक्षात पडली होती.''

**प्र. ४. हे शब्द असेच लिहा. वाचा.**

प्रामाणिक, रिक्षा, पिशवी, सामान, आभार.

**प्र. ५. एखाद्या रिक्षावाल्याचा तुम्हांला आलेला अनुभव सांगा.**

**प्र. ६. रिक्षावाला परत आलाच नसता, तर मावशी काय काय बोलली असती, ते कल्पना करून सांगा.**

**प्र. ७. लिहा.**

(अ) **जसे :** प्रामाणिक – प्रामाणिकपणा. खरा – खरेपणा.

शूर – ............... भित्रा – ...............

(आ) **जसे :** रिक्षा – रिक्षात. दार – दारात.

घर – ............... वर्ग – ...............

- **खालील वाक्ये वाचा. १ ते ११ पाठांतील आशयातून आलेले शब्द पुढे दिलेल्या आकृतीत क्रमाने लिहा.**

१. या अक्षराने शब्दांची सुरुवात होत नाही.

२. मुरकत, गिरकत येते.

३. देशाचे रक्षण करणारा.

४. चीज यावर किसून टाकतात.

५. बहीण भावाला राखी बांधते तो सण.


६. फुलांभोवती फिरणारे.

७. वेश बदलण्याला म्हणतात.

८. लोण्याच्या गोळ्यासाठी भांडणारी.

९. आरोग्यदायक असते.

१०. स्वतःबद्दल बोलायचे असेल, तर हा शब्द वापरतात.



**उपक्रम :** प्रामाणिक व्यक्तींविषयी वृत्तपत्रांत छापून आलेल्या बातम्यांचा संग्रह करा.

# १४. माझा भारत!

• **ऐका. वाचा.**



माझा भारत! माझा भारत!
ऊन, चांदणे, झुळझुळ वारा,
इथे जळाची पावनधारा.
उंच ढगाहुनि इथले पर्वत,
माझा भारत! माझा भारत!

अंधारातिल दीपक होई,
सुखशांतीची वाट दाखवी.
जगा आवडे याची संगत,
माझा भारत! माझा भारत!

माया करितो सकलांवरती,
आम्हां देतसे अनेक नाती.
आपुलकीची अमोल दौलत,
माझा भारत! माझा भारत!

मंगलगीते याची गाइन,
सेवेसाठी तत्पर राहिन.
याच्यापायी वाहिन जीवित,
माझा भारत! माझा भारत!

**– संजीवनी मराठे**

---

**शब्दार्थ :** **जळ** – पाणी. **पावन** – पवित्र. **सकलांवर** – सगळ्यांवर. **अमोल** – मूल्यवान, ज्याची किंमत करता येत नाही असे. **याच्यापायी** – याच्यासाठी. **जीवित** – जीवन.

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) या कवितेत भारताच्या कोणकोणत्या विशेष गोष्टींबद्दल सांगितले आहे?

(आ) 'अंधारातील दीपक' असे कोणाला म्हटले आहे?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) झुळुझुळु | (१) अमोल दौलत |
| (आ) पावन | (२) वारा |
| (इ) ढगाहून उंच | (३) जळाची धारा |
| (ई) सुखशांतीची | (४) पर्वत |
| (उ) आपुलकीची | (५) वाट |

**प्र. ३. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

झुळुझुळु, तत्पर, याच्यापायी, जीवित.

**प्र. ४. खालील शब्दांसाठी कवितेत आलेले शब्द शोधा व लिहा.**

१. पाणी २. दिवा ३. सोबत ४. आपलेपणा ५. संपत्ती

**प्र. ५. शब्दकोडे सोडवा.**

१. आपण तहान लागल्यावर पितो.
२. हिरव्या रंगाचे हे झाडाला असते.
३. चारनंतर येणारा अंक.
४. भिंतीवर राहणारा प्राणी.




१. पक्षी या शब्दाला समान अर्थाचा शब्द.
२. हा ढगातून पडतो.
३. चौथीनंतर येणारी इयत्ता.
४. हिरव्या रंगाची एक पालेभाजी




- **चौकटींत काही पक्ष्यांची व प्राण्यांची नावे लपलेली आहेत ती शोधा व लिहा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ह | त्ती | स | सा | ब | द | क |
| रि | हं | पो | प | ग | वा | बु |
| ण | स | का | व | ळा | घ | त |
| लां | ड | गा | ट | सु | ता | र |
| सिं | ह | ढ | य | रू | कु | त्रा |
| का | स | व | घु | ब | ड | वा |

**शिक्षकांसाठी :** देशभक्तिपर गीतांचा संग्रह करून त्यातील काही गीते म्हणण्याचा वर्गात वारंवार सराव घ्यावा.

# १५. वाढदिवस

• **वाचा.**

बाई वर्गात आल्या. त्यांनी वर्गाकडे एक नजर टाकली. समोरच्याच बाकावर रमेश बसला होता. दररोज शाळेचा गणवेश घालणारा रमेश आज रंगीत कपडे घालून आला होता. आज रमेशचा वाढदिवस, हे बाईंनी ओळखले. बाईंनी रमेशला पुढे बोलावले.

बाई म्हणाल्या, ''मुलांनो! आज रमेशचा वाढदिवस आहे. आपण त्याला टाळ्या वाजवून शुभेच्छा देऊया.'' सर्व मुलांनी रमेशला शुभेच्छा दिल्या.



''आपला वाढदिवस साजरा झाला, की आपल्याला आनंद वाटतो; पण तुम्ही इतरांचे वाढदिवस साजरे करता का?'' बाईंनी विचारले. वर्गातील बहुतेक मुलांनी 'होऽऽ' म्हणत हात वरती केले. बाई रमेशकडे बघून म्हणाल्या, ''रमेश तू सांग बरं, कोणाचा वाढदिवस साजरा केलास ते.''

रमेश म्हणाला, ''आईबाबा दरवर्षी आमचे



वाढदिवस आनंदात साजरे करतात. ते आम्हांला भेटवस्तू देतात. माझ्या बाबांचं बालपण गरिबीत गेलं. त्यांच्या बालपणात त्यांचे वाढदिवस कुणी साजरे केले नाहीत. यावर्षी मी आणि ताईनं ठरवलं, 'आपण बाबांचा वाढदिवस साजरा करायचा.' माझ्या ताईनंच नियोजन केलं. तिनं केक आणला. मी छानसं भेटकार्ड तयार केलं. दोघांनी मिळून घरात सजावट केली. आम्ही बागेतल्या फुलांचा छान गुच्छ तयार केला. आईनं बाबांच्या आवडीचे पदार्थ केले. आम्ही सर्वांनी बाबांचा वाढदिवस आनंदात साजरा केला. बाबांना आमचं कौतुक वाटलं. वाढदिवस बाबांचा झाला, पण बक्षीस मात्र आम्हां दोघांना मिळालं.''

बाई म्हणाल्या, ''मुलांनो ! रमेश आणि त्याच्या ताईने त्यांच्या बाबांचा वाढदिवस किती छान साजरा केला!''

बाईंनी रमेशचे कौतुक केले.

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा व लिहा.**

(अ) 'आज रमेशचा वाढदिवस आहे,' हे बाईंनी कसे ओळखले?

(आ) रमेशचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बाईंनी काय केले?

(इ) वाढदिवस साजरा केला, म्हणजे मुलांना काय वाटते?

(ई) वाढदिवस साजरा करण्याबद्दल बाईंनी कोणाला प्रश्न विचारला?

(उ) रमेशने बाबांच्या वाढदिवसाला काय तयार केले?

(ऊ) वाढदिवसासाठी ताईने काय आणले?

**प्र. २. तुमच्या मनाने उत्तरे सांगा.**

(अ) तुमच्या घरी कोणाकोणाचे वाढदिवस साजरे करतात? कसे करतात?

(आ) तुमच्या शाळेत/वर्गात तुमचे वाढदिवस साजरे करतात का? कसे करतात?

**प्र. ३. खालील शब्दसमूह वापरून वाक्ये लिहा.**

(अ) आनंद वाटणे (आ) साजरा करणे (इ) कौतुक करणे (ई) टाळ्या वाजवणे.

**प्र. ४. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

वर्गात, सर्वांना, टाळ्या, शुभेच्छा, यावर्षी, कौतुक, बक्षीस.

**प्र. ५. तुम्ही तुमचा वाढदिवस कसा साजरा करता ते सांगा.**

- **वाचा.**

आमच्या शेजारी शिंदे आजोबांचं घर आहे. त्यांचा मुलगा परगावी नोकरी करतो. आजोबा व आजी गावीच राहतात. आजोबा सामान आणायला मार्केटमध्ये गेले, की एखादी तरी गोष्ट विसरतात. आजींना ती वस्तू लगेच हवी असते. आजोबा मला हाक मारतात अन् विचारतात, 'देतोस का रे आणून?' मी पळत पळत जाऊन त्यांची वस्तू आणून देतो. आजीला फळीवरच्या वस्तू काढून द्यायचं काम माझंच असतं. आजोबांना रात्रीचं डोळ्यांनी कमी दिसतं, म्हणून आजोबा मला बऱ्याचवेळा हाक मारतात. मी त्यांना मदत करतो.

आईबाबा बाहेर गेल्यावर मला याच आजीआजोबांचा आधार असतो. आजी मला खूप छानछान गोष्टी सांगते, तर आजोबा त्यांच्या लहानपणीच्या आठवणी सांगतात. ते ऐकताना मला खूपच मजा येते. एखादं गणित सुटलं नाही किंवा शब्दांचा अर्थ समजला नाही, तर मी आजोबांकडे जातो. आजोबा बाहेर गेले, की आठवणीनं माझ्यासाठी खाऊ आणतात. आमच्या गल्लीतले सगळे मला शिंदे आजोबांचाच नातू समजतात.

- **खालीलप्रमाणे विविध आकारांची, रंगांची भेटकार्डे तयार करा. विविध सण, वाढदिवसाच्या दिवशी आपल्या मित्रमैत्रिणींना भेट द्या.**







BEBETF

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. विद्यार्थी ज्या ठिकाणी वाचताना अडखळतील त्या ठिकाणी त्यांना मदत करावी. या पृष्ठावर दिलेला उतारा पूरक वाचनासाठी दिलेला आहे. त्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. तसेच त्या उताऱ्यातील परिच्छेदाचे अनुलेखन करून घ्यावे.

# १६. घामाचा तलाव

- **वाचा.**



कनकपूर नावाचे छोटेसे गाव होते. गावात सर्व लोक आनंदाने राहत होते. गावात भांडणतंटे व्हायचे; पण ग्रामपंचायत सामोपचाराने न्यायनिवाडा करायची. गावातील प्रश्न गावातच सुटायचे.

गावच्या सरपंच शांताबाई होत्या. त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने गाव स्वच्छ व सुंदर केले. सरकारी योजनेतून गावात सुधारणा केल्या. एका वर्षी पावसाने दडी मारली. मोठा दुष्काळ पडला. गावच्या विहिरी कोरड्या पडू लागल्या. पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळेनासे झाले. सर्व गाव काळजीत पडले.

महिनाभर पुरेल इतकेच पाणी गावात होते. गावकरी पाण्यासाठी जाणार तरी कोठे ? जवळपासच्या गावांतही अशीच स्थिती होती.



शांताबाईंनी ग्रामसभा बोलावली. ग्रामपंचायतीचे पंच आणि गावकरी सभेला एकत्र जमले.

शांताबाई ग्रामसभेत बोलू लागल्या, ''बंधू-भगिनींनो, प्रसंग बाका आहे; पण हिंमत हारून चालणार नाही. या संकटातून आपल्याला काहीतरी मार्ग काढायलाच हवा. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवायला हवा. आणखी दोन आठवडे पुरेल एवढेच पाणी आपल्याकडे शिल्लक आहे. आता सर्वांनीच पाण्याचा वापर काटकसरीने केला पाहिजे. आपल्याला कायमस्वरूपी पाण्याचा प्रश्न सोडवायचा आहे. त्यासाठी आपण एक तलाव खोदूया. इच्छाशक्ती व आत्मविश्वास असेल, तर मार्ग नक्कीच सापडतो, अशी माझी खात्री आहे. प्रत्येक कुटुंबातील एकाने आळीपाळीने दोन-दोन दिवस श्रमदान करावे.''

गावकऱ्यांनी जोरात टाळ्या वाजवून संमती दिली. ग्रामपंचायतीने तलाव खोदण्यासाठी फावडी, कुदळी, टिकाव, पहारी, घमेली, टोपल्या आणल्या.

गावकरी जोमाने कामाला लागले. सर्वजण तलाव खोदण्यासाठी घाम गाळू लागले. सर्व गावकरी तलावासाठी राब राब राबत होते. सर्वांच्या कष्टांतून तलाव तयार झाला.

काही दिवसांनी आकाशात काळे ढग जमले. जोरात पाऊस सुरू झाला. गावकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. ते नाचू लागले, गाऊ लागले.

गावाने त्या दिवशी आनंद साजरा केला. पावसाच्या पाण्याने थोड्याच दिवसांत तलाव भरला. गावकऱ्यांच्या मेहनतीला फळ आले. तलावाभोवती गावकऱ्यांनी झाडे लावली.



शांताबाईंनी जिद्दी गावकऱ्यांचे कौतुक केले. त्यांच्यामुळेच गावाला पाणी पुरवणारा तलाव बांधला गेला. गावच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला. गावकरी त्या तलावाला 'घामाचा तलाव' म्हणू लागले.

**– अवधूत म्हमाणे**

---

**शब्दार्थ :** **ग्रामपंचायत** – गावचा कारभार चालवणारी स्थानिक संस्था. **सामोपचाराने** – वाद न घालता, सामंजस्याने. **न्यायनिवाडा** – योग्य निर्णय. **दडी मारणे** – लपून बसणे. **ग्रामसभा** – ग्रामपंचायतीने बोलावलेली सभा. **बाका प्रसंग** – कठीण प्रसंग, मोठी समस्या. **खात्री** – विश्वास, भरवसा. **श्रमदान** – मोबदला न घेता केलेले काम.

---

## स्वाध्याय

**प्र. १. का ते सांगा.**

(अ) सरपंच शांताबाईंनी ग्रामसभा बोलावली.

(आ) कनकपूर गावचे लोक त्यांच्या तलावाला 'घामाचा तलाव' म्हणू लागले.

**प्र. २. खालील शब्दसमूह वापरून वाक्ये सांगा.**


दडी मारणे, काळजीत पडणे, आळीपाळीने, श्रमदान, राब राब राबणे, मेहनतीला फळ येणे.

**प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने सांगा.**

(अ) तुमचे घर स्वच्छ, सुंदर करण्यासाठी तुम्ही काय काय करता?

(आ) तुमची गल्ली किंवा गाव स्वच्छ व सुंदर आहे का? नसेल तर कारणे सांगा.

**प्र. ४. दिलेले शब्द गोलातील शब्दाला जोडून नवीन शब्द तयार करा.**




**प्र. ५. वाचा. हे शब्द असेच लिहा.**

ग्रामपंचायत, ग्रामसभा, न्याय, गावकऱ्यांच्या, वर्षी, दुष्काळ, विहिरी, कोरड्या, पडल्या, प्यायला, पाण्यासाठी, इच्छाशक्ती, आत्मविश्वास, नक्कीच, खात्री, प्रश्न, गावकऱ्यांनी, श्रमदान, आनंदाश्रू.

# १७. वाचूया. लिहूया.

• वाचा. सांगा.





सण, नवीन कपडे, फराळाचे पदार्थ, पणत्या, रांगोळ्या, पाहुणे.

आपण सर्वजण अनेक सण साजरे करतो. त्यांतील दिवाळी हा एक मुख्य सण आहे. सगळे हा सण मोठ्या आनंदाने साजरा करतात. या सणासाठी नवीन कपडे खरेदी करतात. घरासमोर आकाशकंदिल, पणत्या लावतात. अंगणात सुरेख रांगोळी काढतात. फुलांची सजावट करतात. घरात फराळाचे गोड-तिखट पदार्थ करतात. आपल्या मित्रपरिवाराला फराळासाठी बोलवतात. हा सण पाच दिवस असतो, म्हणून याला सणांचा राजा म्हणतात.

दिवाळीतील फराळाच्या पदार्थांची नावे सांगा. दिवाळीतील पाच दिवस कोणत्या नावाने ओळखले जातात? त्या दिवसांचे महत्त्व शिक्षकांकडून माहीत करून घ्या.

सामना, मैदान, खेळ, कबड्डी, संघ, चुरस, विजय, टाळ्या, अभिनंदन, आनंद, स्पर्धा.


हे आमचे खेळाचे मैदान. आम्ही येथे खूप खेळतो. आज या मैदानावर कबड्डीचे सामने सुरू आहेत. अनेक संघ स्पर्धेत उतरले आहेत. त्यांच्यात खूप चुरस आहे. सगळे संघ विजय मिळावा म्हणून चुरशीने खेळत आहेत. सगळीकडे आनंदाचे वातावरण आहे. आमच्या शाळेच्या कबड्डी संघाने अंतिम सामना जिंकला. आम्ही टाळ्या वाजवून खेळाडूंचे अभिनंदन केले.

कबड्डी खेळासाठी किती खेळाडू लागतात? या खेळासाठी आवश्यक कौशल्ये, वेळ, मैदान, गुणदान पद्धत या सर्वांची शिक्षकांकडून माहिती मिळवा.

**शिक्षकांसाठी :** चित्रांशी संबंधित शब्दांचा उपयोग करून वरील परिच्छेद लिहिले आहेत. चित्रांशी संबंधित आणखी काही शब्द व वाक्ये सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

• **वाचा. लिहा.**







| | | |
|---|---|---|
| झाडे, वेली, फुले, फुलपाखरे, लहान मुले, त्यांच्यासाठी खेळणी, कारंजे. | ------------------ | ------------------ |
| ------------------ | मी आहे कलिंगड. माझा रंग हिरवट, काळसर असतो. ------------------ | ------------------ |




• **फुगेवाल्याच्या पिशवीवरील शब्दांसाठी त्याच अर्थाचे दुसरे शब्द फुग्यांवर दिले आहेत. योग्य जोड्या जुळवा व लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून चित्रांशी संबंधित दिलेल्या शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करून घेऊन ती फलकावर लिहावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. ती वाक्ये संबंधित चित्रांखाली लिहिण्यास सांगावे.

# १८. अम्मीची माया

• वाचा.



जना व सलमा या दोघींची खूप मैत्री होती. त्या दोघी एकाच वर्गात शिकत होत्या. त्या दोघींना एकमेकींशिवाय करमत नसे. सलमाचे घर शाळेच्या रस्त्यावरच होते. एके दिवशी सकाळपासून खूप पाऊस पडत होता. पावसाचे पाणी रस्त्यावर जागोजागी साचले होते. पाऊस थांबल्यावर शाळेत जाताना जना सलमाच्या घराकडे निघाली; पण पावसामुळे सर्वत्र चिखल झाला होता. चालता चालता जनाचा पाय घसरला व ती पडली. तिचा गणवेश चिखलाने भरला. दप्तरही चिखलाने भरले. शाळा भरण्याची वेळ झाली होती. ती घाबरून रडू लागली. ती रडत रडत सलमाच्या घरापर्यंत आली.

सलमा जनाची वाटच पाहत होती. सलमाची आईही दारात उभी होती. तिने जनाचे चिखलाने माखलेले कपडे पाहिले. जनाला त्या दोघींना पाहून आणखीन रडायला आले. सलमा धावत आली. सलमाने जनाला विचारले, ''तुला कुठे लागलं तर नाही ना?'' जना म्हणाली, ''नाही गं, पण माझा गणवेश चिखलानं भरलाय, मी कशी शाळेत येऊ?'' अम्मी जवळ येऊन म्हणाली, ''जना, घाबरू नकोस. लागलं तर नाही ना तुला? तुझा गणवेशच खराब झाला ना! होऊ दे. आपण दुसरा घालू.'' ''अम्मी मला थोडं पाणी द्या. मी तो धुऊन घेते व घालते.'' जना म्हणाली.

अम्मीने जनाच्या तोंडाकडे पाहिले. क्षणभर तिला त्या जागी सलमा दिसली.

''जना जरा थांब,'' म्हणून सलमाची आई घरात गेली. सलमाचा दुसरा गणवेश घेऊन आली व म्हणाली, ''जना, हा चिखलानं भरलेला गणवेश बदल. हा सलमाचा दुसरा गणवेश आहे, हा तू घाल. तुझं दप्तरही साफ करून देते.'' तिने जनाला गणवेश घालायला दिला. तिला प्यायला पाणी दिले. सलमा व जना दोघी शाळेत गेल्या.



शाळा सुटल्यावर दोघी घरी आल्या. जना म्हणाली, ''अम्मी, तुम्ही सलमाचा गणवेश मला घालायला दिला, म्हणून मी दिवसभर शाळेत बसू शकले. अम्मी, माझा गणवेश द्या. उद्या शाळेत येताना सलमाचा गणवेश धुऊन घेऊन येते.''

अम्मी घरात गेली. धुऊन वाळवून घडी घालून ठेवलेला जनाचा गणवेश अम्मीने आणला व जनाच्या हातात दिला. जना अम्मीकडे आश्चर्याने पाहतच राहिली.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) जनाचा गणवेश कशाने भरला होता?

(आ) जनाला रडायला का आले ?

(इ) चिखलाने भरलेले कपडे पाहून अम्मीने काय केले ?

(ई) जना अम्मीकडे आश्चर्याने का पाहत राहिली ?


**प्र. २. कपडे चिखलाने भरलेले असताना जना तुमच्या घरी आली असती, तर तुम्ही काय केले असते ?**

**प्र. ३. तुम्ही अनुभवलेल्या पावसाळ्यातील पहिल्या दिवसाचे वर्णन करा.**

**प्र. ४. पावसाच्या कविता मिळवा व त्यांचा संग्रह करा.**

## • खेळत खेळत वाचूया !

### सोंगटी टाका – पुढे चला.




**शिक्षकांसाठी :** खेळ कसा खेळावा, हे विद्यार्थ्यांना सांगावे. एक या घरापासून खेळ खेळायला सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. सोंगटीच्या एका बाजूला लाल रंग, तर दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. लाल रंग पडला, तर एक घर पुढे जावे. हिरवा रंग पडला, तर दोन घरे पुढे जावे. खेळता खेळता शिडी आली, तर ती चढून वरच्या टोकाच्या घरात जावे. तेथील संदेश वाचावा. तेथे विद्यार्थ्यांना बक्षीस मिळेल. सापाचे तोंड असलेल्या घरात सोंगटी आली, तर तेथील संदेश वाचावा. सापाच्या तोंडातून त्याची शेपटी असलेल्या घरात जावे. याप्रमाणे जो शेवटच्या घरात लवकर पोहचेल तो विजयी. गटागटांत हा खेळ घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.

# १९. पलीकडे ओढ्यावर

• वाचा.

पलीकडे ओढ्यावर
माझे गाव ते सुंदर,
झाडाझुडपांत आहे
लपलेले माझे घर.

माझ्या गावातून जाते
चिमुकली हीच वाट,
मला ओढुनिया नेते
माझ्या घराशी ही थेट.

पिंपळाच्या झाडाखाली
लहानसे माझे घर,
तुळशीचे वृंदावन
चिरेबंदी ओट्यावर.

माझी आई येते दारी
माझा भावंडांचा मेळा,
घरी गेल्यावर होतो
माझ्या भोवताली गोळा.

**– गणेश कुडे**



**शब्दार्थ :** **चिमुकली** – लहान. **चिरेबंदी** – दगडाचे भक्कम बांधकाम. **मेळा** – समुदाय.

## स्वाध्याय

**प्र. १. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) ओढ्यावर | (अ) आई |
| (२) झाडाझुडपांत | (आ) वृंदावन |
| (३) गावातून | (इ) घर |
| (४) ओट्यावर | (ई) गाव |
| (५) दारात | (उ) वाट |

**प्र. २. रिकाम्या जागी कवितेतील शब्द लिहा.**

(अ) ................ सुंदर

(आ) चिमुकली ..............

(इ) लहानसे ..............

**प्र. ३. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा. लिहा.**

(अ) कवीला घरी जाण्याची ओढ आहे.

(आ) कवीच्या भावंडांचे कवीवर प्रेम आहे.

**प्र. ४. तुमच्या घराचे वर्णन लिहा.**

**प्र. ५. शेवटचे अक्षर समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

(अ) सुंदर – ................

(आ) वाट – ................


(इ) मेळा – ................

**प्र. ६. उदाहरण वाचा. तसे शब्द लिहा.**

**उदा.,** लहान – लहानसे.

(१) थोडे – (२) जावे –

**प्र. ७. गोलात दिलेला शब्द वाचा. त्याच्याशी संबंधित इतर कोणते शब्द तुम्हांला आठवतात ते बाजूला लिहा. आठवलेल्या सर्व शब्दांचा एकत्रित वापर करून शाळेची माहिती लिहा.**



# २०. महात्मा जोतीराव फुले

BRR7GK

• **वाचा.**

सुमारे दीडशे वर्षांपूर्वीची ही गोष्ट. त्या काळात आपल्या समाजात सगळ्यांना सारखी वागणूक मिळत नसे. तेव्हा भेदाभेद होता. मुलींना तर कोणी शाळेत घालतच नसे. अशा काळात जोतीरावांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. सगळ्यांचे अज्ञान दूर व्हावे म्हणून प्रयत्न सुरू केले. हे काहींना सहन झाले नाही. त्यांनी जोतीरावांचा अनेक प्रकारे छळ केला.

एकदा असे घडले. मध्यरात्रीची वेळ होती. जिकडे



तिकडे सामसूम झाली होती. काळाकुट्ट अंधार पसरला होता. अशा वेळी दोन माणसे जोतीरावांच्या घरात शिरली. त्यांची चाहूल लागताच जोतीराव जागे झाले. ते उठून बसले. जोतीरावांनी विचारले, ''कोण ते? कोण आहे?'' आणि लगेच त्यांनी कंदिलाची वात मोठी केली. पाहतात तो दोन धिप्पाड माणसे हातांत कुऱ्हाडी घेऊन त्यांच्यासमोर उभी! त्यांना पाहून जोतीराव मनातून थोडे चरकले. एवढ्यात त्यांच्या कानांवर शब्द पडले, ''तुमचा खून करण्यासाठी आम्ही आलो आहोत!'' जोतीराव गडबडले नाहीत. त्यांनी उलट प्रश्न केला, ''पण कशासाठी तुम्ही मला ठार मारणार आहात? मी असा तुमचा कोणता गुन्हा केला आहे?''

मारेकरी त्यांच्या या प्रश्नाला काय उत्तर देणार? ते गडबडले. एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. मग एकजण म्हणाला, ''तसं बघायला गेलं तर तुम्ही आमचं काही वाईट केलं नाही.''

''मग कशासाठी तुम्ही मला ठार मारणार आहात?'' जोतीरावांनी विचारले.

आता त्यांना खरे सांगणे भागच होते. त्यांनी उत्तर दिले, ''काही लोकांनी 'तुम्हांला ठार मारा' असं आम्हांला सांगितलं, म्हणून आम्ही आलो.''

जोतीरावांनी शांतपणे विचारले, ''पण मला मारून तुम्ही काय मिळवणार आहात? यात तुमचा काय फायदा?'' एकजण म्हणाला, ''आम्हांला एक-एक हजार रुपये मिळणार आहेत.''

ते ऐकून जोतीरावांनी क्षणभर विचार केला आणि ते त्यांना म्हणाले, ''बाबांनो, माझ्या मृत्यूमुळे तुमचा असा फायदा होणार असेल, तर मला खुशाल मारा. गोरगरीब लोकांसाठी मी आजवर कष्ट करत आलो. त्याच लोकांच्या हातून मरण येणार असेल, तर ते मी माझं मोठं भाग्य समजेन. माझं सारं आयुष्य तुमच्यासाठीच आहे.'' आणि त्यांनी आपली मान मारेकऱ्यांच्या पुढे वाकवली.

मारेकरी गोंधळून गेले. ते मनातून कचरले. जोतीरावांचे धैर्य पाहून मारेकऱ्यांच्या हातांतल्या कुऱ्हाडी गळून पडल्या. मारेकरी भानावर आले. आपली चूक त्यांच्या ध्यानी आली. ते दोघेही जोतीरावांच्या पायाला स्पर्श करून म्हणाले, ''तात्यासाब, आमचा गुन्हा पोटात घालावा.''

जोतीराव हे महात्मा होते. ते म्हणाले, ''हे पाहा, आता जे घडलं ते कुठेही बोलू नका. इतकंच काय, पण ज्यांनी तुम्हांला इथे पाठवलं त्यांचीही नावं कुणाला सांगू नका. अरे, आपण काय करत आहोत हे त्यांना तरी कुठे माहीत आहे?''

ते दोन मारेकरी म्हणजे धोंडिबा रोडे व धोंडिराम नामदेव कुंभार. जोतीरावांच्या रात्रीच्या शाळेत ते दोघेजण दाखल झाले. रोडे हा जोतीरावांचा अंगरक्षक बनला आणि धोंडिराम नामदेव कुंभार हा शिकून मोठा

पंडित झाला.

एकदा जोतीरावांना व्याख्यानाला बोलावणे आले. आयोजकांनी जोतीरावांच्या गळ्यात भला-मोठा हार घातला. अंगरक्षक धोंडिबाच्या लक्षात आले, की हारात काहीतरी वळवळते आहे. तो ओरडला, ''तात्या हारात साप आहे.'' तो धावला. त्याने हार हिसकावून घेतला आणि हारातील साप काढून बाजूला सोडून दिला.

जोतीरावांचा जीव वाचवला म्हणून साऱ्यांनी धोंडिबाला शाबासकी दिली.

**– हरी नरके**

---

**शब्दार्थ :** **सामसूम होणे** – शांतता पसरणे. **चाहूल लागणे** – अंदाज येणे. **मन चरकणे** – गोंधळणे. **कचरणे** – कच खाणे. **भानावर येणे** – जाणीव होणे. **ध्यानी येणे** – समजणे. कळणे. **गुन्हा पोटात घालणे** – माफ करणे, क्षमा करणे.

---

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा व लिहा.**

(अ) पुण्यामध्ये मुलींसाठी पहिली शाळा कोणी काढली?

(आ) जोतीरावांकडे आलेले मारेकरी कोण होते?

(इ) जोतीरावांच्या बोलण्याचा मारेकऱ्यांवर कोणता परिणाम झाला?

(ई) जोतीरावांना महात्मा का म्हणतात?

**प्र. २. खालील वाक्ये कोण, कोणास म्हणाले ते लिहा.**

(अ) ''माझं सारं आयुष्य तुमच्यासाठीच आहे.''

(आ) ''तात्यासाब, आमचा गुन्हा पोटात घालावा.''

**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) जोतीराव धीट होते. | (१) जोतीरावांनी मारेकऱ्यांना रात्रीच्या शाळेत प्रवेश दिला. |
| (आ) जोतीरावांना गोरगरिबांच्या कल्याणाची तळमळ होती. | (२) मारेकऱ्यांना पाहून जोतीराव गडबडले नाहीत. |

**प्र. ४. पाठातील खालील शब्द समूहांचा वापर करून वाक्ये लिहा.**

सामसूम होणे, गोंधळून जाणे, भानावर येणे, चाहूल लागणे.

**प्र. ५. खालील शब्द वाचा व जसेच्या तसे पाहून लिहा.**

वर्षांपूर्वी, गोष्ट, त्यांच्या, मध्यरात्री, काळाकुट्ट, धैर्य, ध्यानी, महात्मा, रात्री.

**प्र. ६. खालील शब्दांचे अर्थ पाहा. समजून घ्या.**

१. **मान :** (अ) मान – शरीराचा अवयव.

(आ) मान – सन्मान, आदर.

२. **वात :** (अ) वात – वारा, हवा.
(आ) वात – पणती, निरांजन, कंदील इत्यादींतील वात.
(इ) वात – विकार, शरीरातील एक दोष.

यांसारखे आणखी शब्द माहीत करून घ्या.

**प्र. ७. या पाठात 'काळाकुट्ट' हे रंगाचे नाव आले आहे. 'काळा' रंग गडद असेल, तर 'काळाकुट्ट' हा शब्द वापरतात. रंग गडद, फिकट असेल तर कोणता शब्द वापरावा याची माहिती खाली दिली आहे ती वाचा. खाली दिलेल्या रंगांच्या एकेका वस्तूचे नाव सांगा.**

| रंग | रंगछटा | |
|---|---|---|
| | गडद | फिकट |
| काळा | काळाकुट्ट | काळसर |
| पिवळा | पिवळाधमक | पिवळसर |
| लाल | लालभडक | लालसर |
| हिरवा | हिरवाकंच | हिरवट |
| पांढरा | पांढराशुभ्र | पांढरट |
| निळा | निळाशार | निळसर |

- **वाचा.**


**आमचा परिसर : आमची स्वच्छता**


रविवारचा दिवस होता. आम्ही मुले खेळत होतो. आमचा दंगा ऐकून दामूनाना घराबाहेर आले. 'मुलांनो, कोणते खेळ खेळता तुम्ही?' असे विचारत माझ्याजवळ येऊन म्हणाले, ''अरे रघू, जरा तुझ्या मित्रांना बोलव.'' मी जरा घाबरलो. सर्व मुले त्यांच्याभोवती जमा झाली. दामूनाना म्हणाले, ''मुलांनो, मी तुम्हांला एक गंमत सांगणार आहे. इथे कितीतरी खड्डे, कचरा, दगड आहेत. तुम्हांला खेळताना दगड लागतात, खड्ड्यांमुळे त्रास होतो, शिवाय इथे गवतही वाढलेलं आहे. डासही चावतात, म्हणून आपण हा परिसर स्वच्छ करूया.'' मुलांना ही सूचना आवडली.

आसपास खेळणारी मुलेही जमा झाली. दामूनानांनी टोपली, झाडू, फावडे आणले. मुलांनी प्रथम तेथील प्लॅस्टिक, कागदांचा कचरा गोळा करून त्याचा एका बाजूला ढीग लावला. कोणी झाडून काढले. कोणी रस्त्यात पडलेले दगड, इतर वस्तू गोळा केल्या. खड्ड्यांत दगड व त्यावर माती टाकली. मुलांची धावपळ पाहून परिसरातील इतर माणसेही जमा झाली. तीही स्वच्छतेच्या कामाला लागली. सर्व परिसर स्वच्छ व सुंदर झाला. दामूनाना म्हणाले, ''मुलांनो, आता नेहमीच आपण आपला परिसर स्वच्छ ठेवूया.''

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वरील उताऱ्याचे प्रकट वाचन व अनुलेखन करून घ्यावे.

- पावसाच्या सरींवरील शब्द, छत्रीवरील चित्रे व कागदी नावांवरचे शब्द यांपासून वाक्ये तयार करा.



- वर दिलेली चित्रे ओळखा. चित्रांशी संबंधित वाक्ये तयार करा व लिहा.

उदा., ससा पांढराशुभ्र आहे. ससा गवत खातो. सशाला भित्रा प्राणी म्हणतात.
मला ससा खूप आवडतो.









महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुगमभारती इयत्ता पाचवी

₹ २१.००